# प्रेस नोट

दिनांक :- ११/०९/२०२५

आलोसे श्री.सुमित शंकरराव अक्कलवार, वय ३२ वर्ष, पद वन सर्वेक्षक, नेमणुक उंपवनसंरक्षक कार्यालय वनविभाग यवतमाळ ता.यवतमाळ जि.यवतमाळ ह.मु. सुखकर्ता अपार्टमेंट बप्पी पहेलवान चौक,यवतमाळ, रा.मु.कोची, पोस्ट - रुंझा ता. घाटंजी जि.यवतमाळ जि. यवतमाळयांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळ, यांनी रंगेहाथ पकडलेबाबत...

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | यवतमाळ युनिट |
| पो.स्टे व गुन्हा नोंद कमांक व कलम | पो.स्टे. यवतमाळ शहर जिल्हा-यवतमाळ, अप.क. ८१४/२०२५<br>कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | आलोसे श्री. सुमित शंकरराव अक्कलवार वय ३२ वर्ष, पद वन सर्वेक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय यवतमाळ जि.यवतमाळ रा.मु कोची पो.रुंझा ता. घाटंजी जि यवतमाळ सध्या रा. सुखकर्ता अपार्टमेंट बप्पी पहेलवान चौक,यवतमाळ |
| मागितलेली लाचेची रक्कम | ३०,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | दिनांक १०/०९/२०२५ रोजी तडजोडी अंती १५,०००/- रुपये उपवनसंरक्षकक कार्यालय यवतमाळ येथे स्विकारले |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांनी निविदा प्रकिये दवारे जोडमोहा वनपरिक्षेत्र कार्यालयअंतर्गत रुईकर ट्रस्ट ची सागवान वृक्ष तोड करण्यासंबंधाने परवानगी मिळणेबाबत अर्ज दिला होता.त्यावरुन नमुद शेताला लागुन सरकारी जंगल असल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी जोडमोहा यांनी सदर चारही प्रकरणे उपवनसंरक्षक कार्यालय,यवतमाळ यांचे मार्फत वन सर्वेक्षक यवतमाळ यांचेकडे शेताचे सिमांकन करणेकरिता पाठविले होते.दिनांक ०१/०९/२०२५ रोजी तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक वन सर्वेक्षक श्री.सुमीत अक्कलवार यांची भेट घेतली असता, आरोपी लोकसेवक श्री सुमीत अक्कलवार यांनी चारही शेताची पाहणी झाल्याचे सांगुन त्यातील एका शेत सर्वेमध्ये त्रुटी असुन इतर तीन शेताचे सर्वे सिमांकन अहवाल तयार करुन वनपरिक्षेत्र कार्यालय जोडमोहा येथे पाठवायचे असेल तर ३०,००० /- रुपये दया असे म्हणुन लाचेची मागणी केल्याबाबतची तकार दिनांक ०९/०९/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळ येथे दिली होती .त्यावरुन दिनांक ०९/०९/२०२५ रोजी तक्रारदारांचे लाच मागणी तक्रारीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक श्री सुमीत अक्कलवार यांनी तक्रारदार यांना एका शेता सर्वे मधील त्रुटी पुर्ण करण्याकरिता व तिन शेत सर्वेचे सीमांकन अहवाल पुर्ण केल्याबाबतचे प्रत्येकी अहवालाचे ५००० रु प्रमाणे १५००० रु ची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले आज दि.१०/०९/२०२५ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे यांनी १५००० रु लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने आलोसे यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेवुन, तक्रारदार यांची तक्रार नोंदवुन गुन्हयाचे तपासकामी अटक करण्यात आली आहे. गुन्हयाची पडताळणी व सापळा यांची माहीती मा.वरिष्ठांना फोनदवारे कळविलेली असुन त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे पुढील तपास करित आहोत. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,यवतमाळ तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ येथे संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ, दगडी इमारत, टांगा चौक यवतमाळ
संकेत स्थळ :- dyspacbyavatmal@mahapolice.gov.in
टोल फी कमांक :- १०६४ दुरध्वनी कमांक :- ०७२३२- २४४००२/

श्री. अभय आष्टेकर, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. यवतमाळ मो.नं. ८२७५०८८७९७
श्री.अर्जुन घनवट,पोलीस निरीक्षक ,ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.९६२३१०१७०६
श्री.मनोज ओरके ,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.८८५५०८०००७

(अभय आष्टेकर )
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ